MHKO100010512023

**नियमीत दिवाणी दावा क्र. २०६/२०२३**

बाजीराव विठ्ठल उर्फ विठोबा देसाई.
विरुध्द
पार्वती शंकर देसाई.

## निशाणी क्रमांक ५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे दाव्याचा अंतिम निर्णय होईपावेतो तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी निशाणी क्र.१६ येथे त्यांचा खुलासा दाखल केलेला आहे.

२. अर्ज व खुलाशाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीच्या वकीलांचे युक्तीवाद ऐकले. वादी व प्रतिवादींच्या परस्पर विरोधी कथनांवरुन खालील प्रश्न काढलेले असुन त्यावरील निष्कर्ष त्या खालील कारणमिमांसेच्या आधारे नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने असे शाबीत केले काय की, त्याच्या म्हणण्यात प्रथमदर्शनी तथ्य आहे ? | नाही. |
| २. | वादीने पुढे असे शाबीत केले काय की, न्यायाचा समतोल त्याच्या बाजुने आहे ? | नाही. |
| ३. | वादीने पुढे असे शाबीत केले काय की, अर्ज मंजुर न केल्यास त्याचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल ? | नाही. |
| ४. | आदेश काय ? | अर्ज नामंजुर करणेत येतो. |

## कारणमिमांसा

**दावा मिळकतीचे वर्णन-**

३. ग्रामपंचायत जांभूळवाडी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर येथील मिळकत क्र.२७/२ ची आर.सी.सी. घर, पडसर खुली जागा तसेच दगड, विटा व मातीमध्ये बांधकाम केलेली खोली अशी मिळकत असून सदर मिळकत पूर्व व पश्चिम अशा दोन दिशेमध्ये विभागलेली आहे. पूर्वाभिमुख असलेल्या मुख्य इमारतीच्या ईशान्य कोप-यात दगड, विट, व मातीमध्ये बांधकाम असलेली स्वतंत्र खोली याची मोजमापे पूर्व-पश्चिम ९ फुट रुंद व दक्षिण-उत्तर १२ फुट लांब अशी आहेत. याचे क्षेत्र १०.४ चौ.मी. असुन यासी चतुःसिमा खालीलप्रमाणे -

पूर्वेस - प्रभाकर देसाई यांची मिळकत क्र.२७/३ ची खुली जागा व त्यामध्ये असणारी जमीनीत बांधलेली पाण्याची टाकी,

पश्चिमेस - शंकर धनाजी देसाई यांची २७/१ या मिळकतीपैकी खोली व त्याला लागून वादी यांच्या २७/२ या मिळकतीमधील आर.सी.सी. घर,

दक्षिणेस - मुख्य इमारतीमध्ये येण्या-जाण्यासाठी मध्यभागी ४ फुट रुंदीचा सोडलेला रस्ता व त्याला लागून शंकर धनाजी देसाई यांची मिळकत क्र.२७/१ मधील आर.सी.सी.घर,

उत्तरेस - ग्रामपंचायत रस्ता.

येणेप्रमाणे मिळकत ही या अर्जाचा विषय आहे. (यापुढे या मिळकतीस "दावा मिळकत" म्हणून संबोधण्यात येईल).

४. वादी यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ निशाणी क्र.३, १३ व १८ येथे खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केलेली आहेतः-

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| ०१. | ग्रामपंचायत जांभूळवाडी यांचेकडील मालमत्ता क्र.२७/२ चा सन २०१९ ते २०२३ सालासाठीचा घरठाण उतारा. |
| ०२. | दावा मिळकतीचे फोटो. |
| ०३. | नियमीत दिवाणी दावा क्र.७३/२०११ मधील न्यायनिर्णयाची सही शिक्याची नक्कल. |
| ०४. | नियमीत दिवाणी दावा क्र.७३/२०११ मधील हुकूमनाम्याची सही शिक्याची नक्कल. |
| ०५. | नियमीत दरखास्त क्र.५२/२०१७ मधील निशाणी क्र.१ व त्यावरील आदेशाची सही शिक्याची नक्कल. |
| ०६. | ग्रामपंचायत जांभूळवाडी यांचेकडील मालमत्ता क्र.२७/१ चा सन २०२३ ते २०२७ या सालासाठीचा असेसमेंट उतारा. |
| ०७. | दिनांक ०१/०१/२०२४ रोजीचे श्री. सरस्वती विद्यालय, जांभुळवाडी, ता.गडहिंग्लज यांचेकडील उषा शंकर देसाई यांचे बोनाफाईड प्रमाणपत्र. |
| ०८. | दिनांक ०१/०१/२०२४ रोजीचे श्री. सरस्वती विद्यालय, जांभुळवाडी, ता.गडहिंग्लज यांचेकडील मंगला शंकर देसाई यांचे बोनाफाईड प्रमाणपत्र. |
| ०९. | अशोक केशव देसाई यांचे शपथपत्र. |

५. प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

**प्रश्न क्रमांक १ ते ३ करीताः -**

६. वरील सर्व प्रश्न हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे अर्जातील कथनांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता त्यांचेवर एकत्रीतपणे चर्चा करण्यात येत आहे. वादीच्या कथनाप्रमाणे, दावा मिळकत ग्रामपंचायत मिळकत क्र.२७/२ ही वादीचे पूर्वहक्कदार विठोबा धनाजी देसाई यांना आणि ग्रामपंचायत मिळकत क्र.२७/१ ही प्रतिवादीचे पूर्वहक्कदार पती शंकर धनाजी देसाई यांना वाटपामध्ये मिळालेली आहे. दावा मिळकतीमध्ये वादी व त्याचे पूर्वहक्कदाराचे शांततामय कब्जेवहिवाट होती व आहे. दावा मिळकत घराचे प्रवेशद्वार हे पूर्वाभिमूख असुन घराच्या मध्यभागी जाणेयेणेसाठी ४ फुट रुंदीचा पूर्व-पश्चिम रस्ता सोडलेला आहे. प्रतिवादीने सदर ग्रामपंचायत मिळकत क्र.२७/१ या मिळकतीचा कब्जा मिळणेकरीता दिवाणी दावा क्र.७३/२०११ दाखल केला होता. सदर दाव्यामध्ये वादीने तिचे मयत पतीचे संपूर्ण वारसांना पक्षकार न करता सदर दावा वादीचे भाऊ प्रभाकर देसाई यांचेविरुध्द दाखल केला होता. सदर दाव्यामध्ये प्रतिवादींना खोडसाळपणाने सदर ग्रामपंचायत मिळकत क्र.२७/१ या मिळकतीला वादीच्या दावा मिळकतीच्या चतुःसिमा नमुद करुन सदर दावा न्यायालयाची दिशाभूल करुन मंजुर करुन घेतला. सदर दाव्यात झालेल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरीता वादीस दावा मिळकतीमधून काढल्यास त्याला त्याच्या कायदेशिर ताब्यास मुकावे लागणार असुन त्याचेविरुध्द अन्याय होणार आहे. सबब, सदर दिवाणी दावा क्र.७३/२०११ मधील झालेला हुकूमनामा वादीचे हक्कावर बंधनकारक नसल्याचे हक्कज्ञापन होऊन मिळणेकरीता प्रस्तुत दावा दाखल केला असुन सदर दाव्यात असलेल्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणेत येऊ नये अशी प्रतिवादीविरुध्द कायम मनाईची मागणी केलेली आहे. सबब, प्रस्तुत अर्जान्वये दिवाणी दावा क्र.७३/२०११ मधील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरीता दाखल नियमीत दरखास्त क्र.५२/२०१७ च्या अंमलबजावणीमध्ये वादीचा कब्जा काढून घेण्यात येऊ नये अशी तुर्तातुर्त मनाई आदेशाची मागणी केली आहे.

७. याऊलट प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे, वादीने खोटा दावा दाखल केला असुन चुकीच्या व खोटया चतुःसिमा नमुद केलेल्या आहेत. ग्रामपंचायत मिळकत क्र.२७ ही प्रतिवादीचे पती व त्यांचे भाऊ विष्णू आणि विठोबा यांचे हिश्यात देण्यात आली होती. सदर मिळकत ही पूर्वाभिमुख असुन त्यामध्ये ६ खोल्या आहेत. त्यापैकी ३ खोल्या दक्षिण बाजूला व ३ खोल्या उत्तर बाजूला असुन त्यामधून पूर्व-पश्चिम अशी ४ फुट रुंदीची

जाणेयेणेकरीता जागा सोडलेली आहे. सदर घराचे पूर्व बाजूच्या दोन खोल्या व त्यासमोरील पूर्वेकडील खुली जागा प्रतिवादीचे पती शंकर यांचे हिश्यात देण्यात आली. त्याच्या दक्षिणेकडील खोलीच्या पश्चिमेकडील दोन खोल्या व त्यालगतचे परसू म्हणजे ग्रामपंचायत मिळकत क्र.२७/३ ही विष्णू यांचे हिश्यात देण्यात आली. त्याचे समोरील व प्रतिवादीच्या उत्तरेकडील पश्चिम बाजूच्या दोन खोल्या व त्यामागील परसू म्हणजे ग्रामपंचायत मिळकत क्र.२७/२ ही वादीचे वडील विठोबा यांचे हिश्यात देण्यात आली. त्याप्रमाणे, त्यांची कब्जेवहिवाट होती व आहे.

८. त्याप्रमाणे, प्रतिवादी हिची ग्रामपंचायत मिळकत क्र.२७/१ या मिळकतीमध्ये मालकी नात्याने कब्जेवहिवाट असताना वादीचे वडील विठोबा व भाऊ प्रभाकर यांनी प्रतिवादीस हरकत अडथळा केल्याने प्रतिवादीने दिवाणी दावा क्र.१६५/२००८ हा त्यांचेविरुध्द कायम मनाईकरीता दाखल केला होता. सदर दावा चालू असताना प्रस्तुत वादीने प्रतिवादीचे मिळकतीवर बेकायदेशिररित्या कब्जा केला. त्यामुळे, सदर दावा दिनांक २६/१०/२०१० रोजी निकाली निघाला असुन त्यामध्ये प्रस्तुत वादीचा बेकायदेशिर कब्जा असल्याचे निष्कर्ष काढून तो कब्जा प्रतिवादीने वादीचे भाऊ प्रभाकर देसाई यांचेकडून कायदेशिर मार्गाने घ्यावा असा निष्कर्ष दिला होता. त्याप्रमाणे प्रतिवादीने वादीचे भाऊ प्रभाकर यांचेकडे वेळोवेळी कब्जाची मागणी केली असता देखील त्याने कब्जा सोडला नाही. त्यामुळे, प्रतिवादीने सदर दिवाणी दावा क्र.७३/२०११ दाखल केला. सदर दावा हा गुणदोषावर चालून दिनांक १०/०३/२०१७ रोजी मंजुर झाला आणि वादीचे भाऊ प्रभाकर देसाई यांनी हुकूमनाम्याचे तारखेपासून दोन महिन्यांचे आत कब्जा देणेबाबत आदेश झाला. सदर दाव्याचे हुकूमनामाप्रमाणे अंमलबजावणीसाठी प्रतिवादीने नियमीत दरखास्त क्र.५२/२०१७ दाखल केली. त्यामध्ये, न्यायालयाने सदर मिळकतीचा कब्जा प्रतिवादीस देणेबाबत हुकूम केलेला आहे. सदर दरखास्तीकामी प्रस्तुत वादी हजर होऊन त्यांनी अर्ज दाखल केला असता सदर अर्ज नामंजुर झालेला आहे. त्यामुळे, वादीने त्याचे भावाशी संगनमत करुन केवळ प्रतिवादीस कब्जा मिळणार या भितीपोटी प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे, तुर्तातुर्त मनाईचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

९. दोन्ही बाजूंच्या कथनांचे अवलोकन कले असता असे दिसून येते की, ग्रामपंचायत मिळकत क्र.२७/२ ही वादीचे मालकीची असुन ग्रामपंचायत मिळकत

क्र.२७/१ ही प्रतिवादीचे मालकीची आहे. तसेच, प्रतिवादी हिने ग्रामपंचायत मिळकत क्र.२७/१ या मिळकतीचा कब्जा मिळणेकरीता दिवाणी दावा क्र.७३/२०११ हा दाखल केलेला होता व तो दिनांक १०/०३/२०१७ रोजी मंजुर करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे, प्रतिवादी हिने नियमीत दरखास्त क्र.५२/२०१७ दाखल केलेली असुन त्यामध्ये हुकूमनाम्यानुसार कब्जा मिळणेकरीता आदेश झालेला आहे. यावरुन, प्रतिवादी हिने ग्रामपंचायत मिळकत क्र.२७/१ बाबत दावा दाखल केला व तो मंजुर होऊन त्याप्रमाणे हुकूमनाम्याची बजावणी करीता आदेश झालेला असल्याचे दिसुन येते. प्रस्तुत दावा व अर्जामध्ये वादीने सदर प्रतिवादी हिचे लाभात झालेला हुकूमनामा वादीवर बंधनकारक नसुन सदर हुकूमनाम्याची अंमलबजावणी करुन वादीचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये अशी मनाईची मागणी केलेली आहे.

१०. याघडीला ही बाब महत्वाची आहे की, ज्यावेळी प्रतिवादी हिचे हक्कामध्ये दिवाणी न्यायालयाने पारीत केलेले न्यायनिर्णय व हुकूमनामा झालेला असुन त्याप्रमाणे अंमलबजावणीचा आदेश देखील झालेला आहे. त्यावेळी, वादीने सदर हुकूमनाम्याच्या अंमलबजावणी विरुध्द तुर्तातुर्त मनाईची मागणी केलेली असताना वादीने त्याचे कथन हे सबळ पुराव्यानिशी प्रथमदर्शनी शाबीत करणे आवश्यक आहे. वादीने कथन केले आहे की, प्रतिवादी हिने तिने दाखल केलेल्या नियमीत दिवाणी दावा क्र.७३/२०११ मध्ये चुकीची चतुःसिमा नमुद करुन वादीच्या दावा मिळकतीची चतुःसिमा नमुद केलेली आहे. वादी व प्रतिवादी यांनी कथन केलेप्रमाणे ग्रामपंचायत मिळकत क्र.२७ मध्ये वाटप होऊन तीन पोटहिस्से पडून स्वतंत्र कब्जेवहिवाट आहे. त्यामुळे, जेव्हा एखाद्या मिळकतीमध्ये सामाईक कब्जेवहिवाट असते, त्याबाबत पूर्वी न्यायनिर्णय व हुकूमनामा झालेला असतो आणि आत्ता त्यामध्ये मनाईचा आदेश मिळणेकरीता अर्ज दाखल केला जातो. तेव्हा, वादीने सर्वप्रथम त्याची मिळकत व त्यावरील कब्जा शाबीत करणे आवश्यक आहे. वादीने त्याचे कथन शाबीत करणेकरीता त्याचे व प्रतिवादीचे मिळकतीचे घरठाण उतारे दाखल केलेले आहेत. सदर उता-यांवरुन वादी व प्रतिवादी यांची वरनमुद प्रमाणे ग्रामपंचायत मिळकत क्र.२७/२ व ग्रामपंचायत मिळकत क्र.२७/१ यांवर मालकी व कब्जा असल्याचे दिसुन येते. परंतु, वादीने कथन केल्याप्रमाणे प्रतिवादीने दाव्याच्या चतुःसिमा चुकीच्या नमुद करुन दावा दाखल केल्याचे आणि प्रतिवादीने प्रस्तुत दाव्यात नमुद केलेल्या चतुःसिमा हया बरोबर असल्याचे दर्शविणेकरीता कोणताही पुरावा याघडीला दाखल केलेला नाही.

११. याव्यतिरिक्त, ज्यावेळी वादीने दावा मिळकतीसंदर्भात मनाई आदेश मागितला असुन चतुःसिमा संदर्भात वाद उपस्थित केलेला आहे, त्यावेळी वादीने दावा मिळकतीचे वर्णन स्पष्ट होणेकामी दावा मिळकत व प्रतिवादीचे मिळकतीचा नकाशा अथवा तत्सम दस्त दाखल करणे अपेक्षित असते. जेणेकरुन वादीचे कथनाप्रमाणे दावा मिळकतीच्या चतुःसिमा हया बरोबर असुन प्रतिवादीने पूर्वी दाखल केलेल्या दाव्यामधील चतुःसिमा चुकीच्या आहेत याबाबत न्यायालयास निष्कर्ष काढणे सोयीस्कर झाले असते. परंतु, वादीने केवळ घरठाण उतारे दाखल केले असुन त्याचे कथनाप्रमाणे दावा मिळकतीच्या चतुःसिमा बरोबर असुन प्रतिवादीने दाव्यात चुकीच्या चतुःसिमा नमुद केल्या याबाबत कोणताही पुरावा याघडीला दाखल केला नाही. त्यामुळे, प्रथमदर्शनी वादीने नमुद केलेल्या दावा मिळकतीच्या चतुःसिमा बरोबर असुन प्रतिवादीने पूर्वी न्यायनिर्णयीत झालेल्या दाव्यामध्ये चुकीच्या चतुःसिमा नमुद केल्या हे शाबीत होत नाही. त्यामुळे, वादीचे कथनामध्ये प्रथमदर्शनी तथ्य असल्याचे दिसुन येत नाही.

१२. वादीतर्फे वकीलांनी *Ganpat Abaji Bhosale & Ors. Vs. Sonubai Gundopant Nikam & Ors., 1995 GoJuris (Bom) 179* या न्यायनिर्णयाचा आधार घेतलेला आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने असे निरिक्षण दिलेले आहे की, वादीने दावा मिळकत त्याचे कब्जेवहिवाटीमध्ये असलेबाबत पुरावा दिलेला असलेने त्याने मागणी केल्याप्रमाणे तो मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहे. प्रस्तुत प्रकरणात वर नमुद प्रमाणे वादीने पूर्वी प्रतिवादीने दाखल केलेल्या दाव्यातील दावा मिळकत ही त्याचे कब्जेवहिवाटीत असलेबाबत अथवा त्याचे या दाव्यातील दावा मिळकतीतील चतुःसिमेबाबत कोणताही सबळ पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे, वादीने मागणी केल्याप्रमाणे तो मनाई हुकूम मिळणेस पात्र नाही. सबब, वादीतर्फे दाखल न्यायनिर्णयातील निरिक्षणे या प्रकरणास लागू होत नाहीत.

१३. याशिवाय, अधिकारक्षेत्र असलेल्या दिवाणी न्यायालयाने न्यायनिर्णय पारीत करुन हुकूमनामा दिलेला असुन त्याचे अंमलबजावणीकरीता दिवाणी न्यायालयाने आदेश पारीत केलेला आहे. सदर न्यायनिर्णय अथवा हुकूमनामा हा आव्हानित झालेला नसुन त्याचेविरुध्द कोणत्याही वरिष्ठ न्यायालयाने आदेश पारीत केलेला नाही. त्यामुळे, सदर न्यायनिर्णय व हुकूमनामा हे कायम आहेत. अशा परिस्थितीमध्ये केवळ वादीने दावा दाखल करुन प्रतिवादीने पूर्वी दाखल केलेल्या दाव्यामध्ये चुकीच्या चतुःसिमा नमुद केल्याचे तोंडी

मोघम कथनावरुन सदर हुकूमनाम्याच्या अंमलबजावणी विरुध्द या न्यायालयास मनाई हुकूम देता येणार नाही. त्यामुळे, न्यायाचा समतोल हा वादीचे बाजुने नाही. तसेच, अधिकारक्षेत्र असलेल्या दिवाणी न्यायालयाने हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरीता आदेश केलेला असल्याने सदर आदेशाविरुध्द मनाई हुकूम दिल्यास सदर हुकूमनाम्यामधील दरखास्तदार म्हणजे प्रतिवादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याऊलट, वादीचे कथनामध्ये प्रथमदर्शनी तथ्य असल्याचे शाबीत न झाल्याने त्याचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, मी प्रश्न क्र.१ ते ३ चे नकारार्थी उत्तर देत आहे.

**<u>प्रश्न क्रमांक ४ करिताः</u>-**

१४. प्रश्न क्र.१ ते ३ चे निष्कर्षाचा व वरील सर्व कारणांचा विचार करता वादीने मागणी केलेप्रमाणे नियमीत दिवाणी दावा ७३/२०११ मधील हुकूमनाम्याप्रमाणे नियमीत दरखास्त क्र. ५२/२०१७ च्या कामी अंमलबजावणी करुन वादीचा कब्जा काढून घेण्यात येवू नये असा मनाई हुकुम देता येणार नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. करिता, प्रश्न क्रमांक ४ चा निष्कर्ष नोंदविण्यासाठी मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

०१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

०२. अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट करण्यात यावा.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by
RATHOD SUJIT
Date: 2024.04.12
17:57:04 +0530

दिनांकः १०/०४/२०२४.
गडहिंग्लज.

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज.

I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 10/04/2024 |
| Order signed by P.O. on | 10/04/2024 |
| Order uploaded on | 12/04/2024 |